हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

६०



ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष ११ वे : अंक २
मे २०२५

# मासिक नवस्नेह

स्वागतमूल्य
₹. 30/-





प्रेषक
**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**
४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# चित्पावन संघातर्फे दिनदर्शिकेचे प्रकाशन






गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर कोल्हापूर चित्पावन संघातर्फे हिंदू नववर्ष दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. मराठी महिने, तिथी, नक्षत्र, शुभमुहूर्त, राशीभविष्य आणि धार्मिक स्थळांची माहिती यांचा समावेश असलेल्या या दिनदर्शिकेची संकल्पना कला कल्पना संस्थेचे श्री. संजीव चिपळूणकर यांनी मांडली व सलग तिसऱ्या वर्षी या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले आहे.

चित्पावन संघाचे ज्येष्ठ संचालक श्री. नंदकुमार मराठे यांनी पारंपरिक दिनदर्शिकेच्या गरजेवर प्रकाश टाकला. उपाध्यक्ष प्रसाद भिडे यांनी उपक्रमाचे महत्त्व सांगितले तर संजीव चिपळूणकर यांनी ही दिनदर्शिका आर्थिक वर्ष दिनदर्शिकेसारखी देखील वापरता येईल, असे स्पष्ट केले. शेवटी केदार जोशी यांनी आभार मानले.

# चैत्रा गौर हळदी-कुंकू कार्यक्रम संपन्न







रवि. ता.६ एप्रिल रोजी कोल्हापूर चित्पावन संघ कार्यालयात भिशीच्या भगिनींचा चैत्रागौर हळदीकुंकू कार्यक्रम साजरा झाला. सर्व भगिनींनी मिळून सुंदर आरास केली होती. चैत्रागौरीची आरती करण्यात आली. थंडगार पन्हे आणि चविष्ट आंब्याच्या डाळीचा सर्वांनी आस्वाद घेतला.

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ११ वे : अंक २ : मे २०२५**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


### अनुक्रम


१) **संपादकीय /४**

२) **ऋतू बरवा - ग्रीष्म /५**

३) **लोकनायक श्रीराम /८** - प्रशांत पोळ

४) **ज्ञानसूर्याची सावली /१२**

५) - सौ. मंजुश्री गोखले
**मुलांचे पान /१४**

६) **सोपानदेवांची अलौकिक सोपानदेवी /१६**

७) - सौ. मंजुश्री गोखले
**ब्राह्मण आणि सरकारी अनुदान /१७**

८) - श्रीकांत शिंत्रे
**नासिक... पंचवटीच्या काळाराम मंदिराचा**

९) **अचंबित करणारा इतिहास /२१**

१०) **स्वयंसिद्धा - एका तेजस्वी**
**मशालीची गाथा /२४** - रमा जाधव

११) **वधूवर माहिती यादी /२५**



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०






हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५



- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष)
9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.


**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी**
**'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. ७ वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी !

सूर्याचं आग ओकणं चालूच आहे. अजून अख्खा मे महिना आपल्याला हे सहन करावंच लागणार ! आपल्याकडे त्याच्यासाठी पर्याय नाही. एसीचा पर्याय एक असू शकतो, पण तो सर्वांकडे नाही ना ! तेव्हा नागपूरसारखं सकाळी ११ नंतर घरातून बाहेर न पडणं आणि संध्याकाळी ६ पर्यंत घरातच किंवा ऑफिसमध्ये राहणं हे एवढंच आपण करू शकतो. तेच करूया !

मित्रांनो, रामनवमी झाली. पण या अंकात श्रीराम प्रभू यांच्यासंबंधीचे दोन उत्तम लेख आहेत. एक आहे, नाशिकच्या काळाराम मंदिरावरील आपल्याला माहित नसलेला इतिहास सांगणारा आणि दुसरा आहे 'लोकनायक श्रीराम', जो लेख जबलपूरहून श्री. प्रशांत पोळ यांनी खास आपल्यासाठी पाठवला आहे. श्री. प्रशांत पोळ हे सातत्याने नवनवीन विषयावरील सुंदर लेख आपल्या मासिकासाठी पाठवत असतात. शिवाय आपल्या अंकातली नेहमीची सदरे तर आहेतच. तेव्हा आमरसाची वाटी आणि आपल्या नवस्नेहचा अंक या दोनच गोष्टी या प्रचंड उन्हाळ्यात आपल्याला थंडावा देऊ शकतात. अर्थात पर्यटन हाही यावर एक थंडावा देणारा इलाज आहे.

मुलांच्या परीक्षा संपल्या आहेत. कुठंतरी छान निसर्गरम्य ठिकाणी जाऊन उन्हाची काहिली कमी करता येईल. पण खरं सांगू? हे प्रत्येक वेळा प्रत्येकाला जमतंच असं नाही. सगळ्यांच्या मनात इच्छा खूप असते, पण अडचणीही तेवढ्याच असतात. खरं ना? म्हणून कदाचित पूर्वी असं म्हणत असतील,

**इच्छाओंका बोझ हमेशा कम रखिए।**

**ता कि जिंदगी का सफर आसान रहेगा।**

मग पर्यटनाला जायचा विचार करताय ना? चला तर... बॅगा भरायला घ्या. अर्थात कमी वजन घ्या हं ! म्हणजे प्रवास सुखाचा होईल, सहलीचा पण आणि जीवनाचा पण ! असो.

हा अंक मे महिन्याचा आहे. पुढचा अंक जूनचा असेल. म्हणजे पावसाचा महिना आणि पावसाची प्रतिक्षा... आहाहा ! नुसत्या विचारानं सुद्धा छान वाटतंय. तुम्हाला एक सांगू, ते मंझिल चित्रपटातलं अमिताभ-मौसमीवर चित्रीत झालेलं गाणं पुन्हा पुन्हा पहा. त्यात किती छान पाऊस दाखवलाय ! त्या दोघांपेक्षा तो पाऊसच छान दिसतोय ! किती बरं वाटतंय ते गाणं बघितल्यावर! आता असाच पाऊस येईल या विचारानंसुद्धा बरं वाटतं ! येईलच पाऊस ! पण तोपर्यंत काय? तोपर्यंत आहेच हा सूर्याजीराव तळपदे ! त्याच्या तावडीत सापडलेले आपण बिचारे ! चला, पावसाची प्रतिक्षा करूया !

यंदा काय बहावा लवकर फुललाय म्हणे ! बहावा फुलला की ६० दिवसांत पाऊस पडतोच म्हणे ! आणि हा अचूक अंदाज आहे, बरं का ! तेव्हा आमरस खाऊ, नवस्नेह वाचू आणि पावसाची वाट बघू ! चालेल ना?

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,

**सौ. मंजुश्री गोखले,**

मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# ऋतू बरवा...



## ग्रीष्म

**माह लगा है जेठ का, गरमी चारों ओर।**
**रवि भी तपन बढ़ा रहे, संध्या हो या भोर ।।**
**आकुल गरमी से सभी, बिजली करती खेल।**
**भीग रहा तन स्वेद से, एसी भी है फेल ।।**

वाचनात आलेला हा मजेशीर दोहा... उन्हाळ्याचा महिना सुरू झालाय... सूर्य सकाळ संध्याकाळ इतकी आग ओकतोय... की बास... सगळे हैराण झालेत त्यात लाईटचे लोडशेडिंग- अक्षरशः घामानं भिजायला होतय..त्याला एसी कसा पुरा पडेल??? आहे ना मजेशीर पण खरखुरं वर्णन... घाम पुसत पुसत... वाचा बरं आता.

आधुनिक कालगणनेनुसार साधारणपणे एप्रिल मध्यापासून ते जून मध्यापर्यंतचा दोन महिन्यांचा हा काळ, ज्याला आपण बोलीभाषेमध्ये 'मे महिन्यातला उन्हाळा' आणि इंग्रजीमध्ये 'समर' म्हणतो. हा उत्तरायणामधील तीन ऋतूंमधला म्हणजे शिशिर, वसंत यानंतरचा शेवटचा ऋतू, जेव्हा उत्तरायणाची परम-स्थिती असते!

हिंदू कालगणनेनुसार साधारणपणे ज्येष्ठ व वैशाख या दोन महिन्यांमध्ये ग्रीष्म ऋतू असतो.

हा चार समशीतोष्ण ऋतूंपैकी सर्वात उष्ण आणि तेजस्वी असतो, जो वसंत ऋतू नंतर आणि शरद ऋतूपूर्वी येतो. उन्हाळ्याच्या संक्रांतीच्या वेळी किंवा त्याच्या केंद्रस्थानी, दिवसाचे प्रकाशाचे तास सर्वात मोठे असतात आणि अंधाराचे तास सर्वात कमी असतात, संक्रांतीनंतर ऋतू जसजसा पुढे जातो तसतशी दिवसाची लांबी कमी होते. सर्वात लवकर सूर्योदय आणि शेवटचे सूर्यास्त देखील संक्रांतीच्या तारखेजवळ होतात. उन्हाळ्याच्या सुरुवातीची तारीख व्याख्या, हवामान, परंपरा आणि संस्कृतीनुसार बदलते. जेव्हा उत्तर गोलार्धात उन्हाळा असतो तेव्हा दक्षिण गोलार्धात हिवाळा असतो.

ग्रीष्म ऋतुमध्ये कोरडे वारे आणि उष्ण सूर्यकिरण येतात जे वातावरण कोरडे करतात आणि पृथ्वीचे थंड गुणधर्म हिरावून घेतात.

**ज्येष्ठा**

ज्येष्ठ हा उन्हाळ्याचा एक सामान्य महिना आहे आणि चंद्र कॅलेंडरनुसार, हा वर्षाचा तिसरा महिना आहे जो अमावास्येला सुरू होतो. हा महिना सामान्यतः मे ते जून या काळात येतो आणि त्यात कडक उन्हाचे दिवस असतात.

**आषाढ**

ज्येष्ठानंतर आषाढ येतो आणि हा ग्रीष्म ऋतूचा दुसरा महिना आणि अमावस्येला सुरू होणारा वर्षाचा चौथा महिना आहे. आषाढ महिना जून ते जुलै या कालावधीत येतो. आषाढ महिन्याच्या अखेरीस, हवामान दमट आणि घामयुक्त होते.ग्रीष्म ऋतू म्हणजे वसंत ऋतूनंतरचा आणि वर्षा ऋतूच्या (पावसाळ्याच्या) आधीचा ऋतू. वसंत ऋतूनंतर हळूहळू उष्णता अधिकाधिक तीव्र होत जाते, ती या ग्रीष्म ऋतूमध्ये!!

ग्रीष्म ऋतूत वटपौर्णिमा, आषाढी एकादशी अशी व्रते येतात.

ग्रीष्म ऋतू हा वसंत ऋतूच्या आधी आणि त्यानंतर पावसाळा येतो. सूर्यकिरणांचा प्रवेश आणि तेजस्वी उष्णता आपल्या शरीरावर आणि पर्यावरणावर कोरडे परिणाम करते. निरोगी आणि सक्रिय राहण्यासाठी ऋतू बदलत असताना जीवनशैलीत बदल करणे अत्यावश्यक आहे.

आयुर्वेदानुसार आपल्या शरीरावर नियंत्रण ठेवणाऱ्या तीन दोषांपैकी एक असलेल्या पित्त दोषात गृष्म ऋतूचा समावेश आहे आणि तो ऊर्जेचा अभाव, निर्जलीकरण, थकवा, कोरडेपणा आणि आळस यांच्याशी संबंधित आहे. म्हणूनच, संतुलन राखण्यासाठी आणि एकूणच आरोग्य राखण्यासाठी आणि शक्तिशाली सूर्यकिरणांच्या दुष्परिणामांपासून आपल्या शरीराचे संरक्षण करण्यासाठी आपल्या शरीराला अधिक द्रवपदार्थांची आवश्यकता असते.

या काळात गरम, मसालेदार, चरबीयुक्त आणि जड पदार्थ खाणे टाळा.

- सक्रिय राहण्यासाठी संतुलित आणि हलका आहार घ्या.
- पाणी, रस आणि ताक यासारखे भरपूर द्रवपदार्थ प्या.
- निसर्गात थंडावा देणारे आणि तुम्हाला शांत करणारे सुगंध आणि परफ्यूम वापरा.
- तुमच्या त्वचेतील अतिरिक्त उष्णता बाहेर काढण्यासाठी थंड पाण्याने आंघोळ करा.
- शक्य तितके घरातच रहा, विशेषतः दिवसा.
- तुमची त्वचा थंड ठेवण्यासाठी आणि श्वास घेण्यासाठी हलके आणि पातळ कपडे घाला.

कुसुमाकर असेही त्याचे एक यथार्थ नाव आहे. कारण नवीन पोपटी, चकचकीत, तजेलदार हिरव्यागार पालवीबरोबर अनेकानेक वृक्षवेलींच्या फुलण्याचा, बहरण्याचा हा काळ असतो.दिवसभर रणरणतं उन आणि उकाड्याने जीव अगदी नकोसा होतो, घामाच्या धारा लागतात आणि कितीही पाणी प्यायलं तरी तहान काही भागत नाही. दुपारच्या उन्हात शक्यतो कुणी बाहेर पडायला मागत नाही. पण, याच उन्हात जर आपण बाहेर पडलो आणि सह्याद्रीच्या डोंगररांगा जवळ केल्या तर आपल्याला भर उन्हाळ्यात हिमवृष्टी झाल्याचा भास होईल. अर्थात हा भासच आहे! मग हे हिमवर्षावासारख भासणारं आहे तरी काय? हा काळा कुडा नावाचा वृक्ष असू शकतो! नावाने जरी काळा कुडा असला तरी फुलं मात्र दुधासारखी सफेद, मनमोहक आणि सुगंधीदेखील ! बाकी जीवसृष्टी जेव्हा सह्याद्रीच्या उन्हात होरपळून निघत असते तेव्हा काळा कुडा मात्र सबंध फुललेला असतो. संपूर्ण वृक्षावर पानं कमी आणि फुलंच जास्त अशी परिस्थिती निर्माण होते. दुरून पाहिल्यावर या वृक्षावर हिमवर्षाव झाल्याचा भास होतो. या भासामुळे काळ्या कुड्याला Snowflake tree म्हणून ओळखतात.

पळस, पांगारा, तामण, अमलताश फुलांनी डवरून जातात. तामणच्या फुलांचा सडा पडतो. रस्ते निळे-जांभळे होतात.ग्रीष्म म्हणजे जीव हैराण करणारा उन्हाळा म्हटला की डोळ्यासमोर निसर्गात रणरणते उन, सुकलेले गवत, पाण्याचे प्रवाह आटलेले असे सगळे डोळ्यासमोर येते. पण ह्याच कडाक्याच्या उन्हात डोळे थंड गार करण्यासाठी निसर्गाने काही झाडांना बहरण्याचे वरदान दिले आहे. पक्षांना घरटी बांधून आपआपली कुटूंब व्यवस्था चालवण्याची मुभा दिली आहे.

रानमेव्याचा आस्वादही आपल्याला ह्याच दिवसात भरभरून घेता येतो. निसर्गाने मात्र भरभरून लयलूट केलेलीच आढळते. आंबा अन् फणसाच्या तऱ्हा तर आणखी वेगळ्या. कोकमं, करवंदं, जांभळं. एखाद्या समृद्ध जंगलात निव्वळ फळांवर गुजराण करता येईल. आंबा, टरबूज, लिची, द्राक्षे, कलिंगड ही उन्हाळ्यातील लोकप्रिय फळे आहेत. याशिवाय ब्लूबेरी, स्ट्रॉबेरी, रास्पबेरी, ब्लॅकबेरी, पीच यांसारख्या फळांचाही उन्हाळ्यात आहारात समावेश करता येतो.

उद्यानात, रस्त्याकडेने, बंगल्यांच्या

आवारातच नव्हे; तर टेकड्यांवर, सह्याद्रीच्या अंगाखांद्यांवर सर्वत्र आढळणारा हा अस्सल भारतीय वृक्ष आहे बहावा!! अगदी आद्य ग्रंथ ऋग्वेदातही त्याला 'राजवृक्ष' म्हणून गौरवलंय! सोन्याच्या दागिन्यांनी नखशिखान्त नटलेला, अंगाखांद्यावरून सोनपिवळ्या पुष्पमाला दागिन्यांसारख्या मिरवणाऱ्या बहाव्याला राजाची उपमा यथायोग्यच वाटते. बहुतेक ठिकाणी हा वृक्ष लहानसाच असतो.गुलमोहराची नजाकत काही औरच असते. उन्हाळ्यात त्याची सुंदर हिरवीपोपटी नाजूक पालवी नयनमनोहर दिसते. लाल, किरमिजी किंवा नारिंगी रंगाच्या अतिसुंदर फुलोऱ्यांनी पानांशी साधलेली विरोधी रंगसंगती डोळयाचे पारणे फेडणारी असते. तलवारीच्या आकाराच्या काही शेंगाही झाडावर दिसतात. गुलमोहराचे हे रंगात येणे फक्त उद्यानात, रस्त्याकडेने आणि मानवी वस्तीच्या आसपासच पहायला मिळते. जंगलात गुलमोहर नसतात.

निसर्गात, जंगलात, निदान गावाजवळच्या टेकड्या-डोंगरांवर आणि नदी-नाल्यांच्या आसपास भ्रमंती करणाऱ्या निसर्गप्रेमींना आपल्या लावण्याने मोहून टाकणारे, उन्हाळ्यात फुलणारे-फळणारे असंख्य जातीचे देशी वृक्ष, आपले वृक्ष आहेत. उदाहरणार्थ फणशी, शिवण, पाडळ, कौशी, आपटा, गेळा, मेडशिंगी, बारतोंडी, नेवर, कळम, अर्जून, आईन, अशोक, रानपांगारा, धामण, मोठा करमळ, रतनगुंज, पाचुंदा, करंज, कांचन, काळा कुडा, पांढरा कुडा, बेल इत्यादी. त्यातले गेळा, मेडशिंगी, बारतोंडी, अर्जून, आईन, मोठा करमळ, पाचुंदा, काळाकुडा आणि पांढराकुडा हे सर्व लहानथोर वृक्ष पांढऱ्या किंवा पांढरट रंगाच्या फुलांचे आहेत.

त्यातले गेळा, अर्जून, आईन, करमळ, काळा व पांढराकुडा जंगलातच आढळणारे, त्यामुळे तसे दुर्मिळ किंवा अल्पपरिचितच आहेत. करंज, वृक्षाची चमकदार पर्णशोभा आणि गुलाबी फुलांचे तुरे मे महिन्यात पाहातच राहावेसे वाटणारे. शिवण, पाडळ आणि धामण हे पिवळ्या फुलांनी वसंत ऋतूतच बहरणारे वृक्ष नंतरही ग्रीष्मात काही काळ फुलत राहतात. त्यापैकी पाडळ हा अतिदुर्मिळ वृक्ष, तर शिवण आणि धामण मुख्यतः डोंगर-टेकड्यांवर वाढणारे वृक्षोत्तम आहेत.

उन्हाळ्यात फळणारे आणखीही काही वृक्ष आहेत. त्याशिवाय पापट आणि लघुअजान अशी झुडूपं आणि कुसर, कांचनवेल आणि हिरणदोडी अशा वेलीही या काळात बहरतात. निसर्गात हिंडले आणि डोळसपणे पाहिले, तर कितीतरी सौंदर्यनिधानं या काळात आपल्याला मोहित करतात.

महाराष्ट्रात उन्हाळ्याच्या सुरुवातीला होळी आणि रंगपंचमी हे सण साजरे केले जातात..जस निसर्गाने रंगाची उधळण केलेली असते... तशी माणूसही आपल्या संस्कृतीनुसार या ऋतूच्या कडक तीव्र उष्णतेला सावरण्याचा, सजवण्याचा प्रयत्न करतो..

एकूण काय तर ऋतूचक्राप्रमाणे आपण आपले जीवनकार्य.. जीवनशैली ठेवली तर स्वर्ग इथेच अवतरतो...!!!

**- वैदेही जोशी,**

मोबा. ९५४५६३५४६५


**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**युनियन बँक ऑफ इंडिया, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 641002050000001)**
**IFSC Code : UBIN0564109**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

# लोकनायक श्रीराम / १



कालचक्राची गती प्रचंड आहे. वेगाने ते फिरतंय. फिरता फिरता ते मागे जातंय. खूप मागे.... इतिहासाची पाने फडफडत आपल्याला घेऊन जाताहेत त्रेता युगात ! कितीतरी हजार वर्षे मागे....!

या त्रेता युगात पृथ्वीवर एक खूप मोठा भूभाग आहे, ज्याला आर्यावर्त नावाने ओळखलं जातंय. हे प्रगत मानवी संस्कृतीचं क्षेत्र आहे. हा समृद्ध देश आहे. उच्च आणि उदात्त मानवी भावभावनांनी येथील समाज प्रेरित आहे. समाजात ज्ञान प्राप्त करण्याची लालसा आहे. उत्सुकता आहे. अध्ययनशील विद्यार्थी आहेत. नव - नवीन ग्रंथ लिहिले जात आहेत. उन्नत अशा ऋषी संस्कृतीचा समाजावर प्रभाव आहे. यज्ञ-याग होत आहेत. वायुमंडल आणि समाजजीवन, दोघांमध्ये शुद्धतेची सतत प्रक्रिया चालू आहे. देव - देवता, पृथ्वीवर असलेल्या या आर्यवर्ताला स्वर्गातून बघत आहेत. या भूभागावरती फेरफटका मारण्याची, येथे निवास करण्याची आकांक्षा त्यांच्या मनात येत आहे.

या आर्यावर्तात, शरयू नदीच्या किनारी वसलेलं एक मोठं जनपद आहे, जे कोशल या नावाने ओळखलं जातंय. हे क्षेत्र समृद्ध आहे. धनधान्याने सुखी आहे. आनंदी आहे.

**कोसलो नाम मुदितः स्फितो जनपदो महान् ।**
**निविष्टः सरयु तीरे प्रभूतधनधान्यवान ।।५।।**

(वाल्मीकी रामायण / बालकांड / पाचवा सर्ग)

या क्षेत्राची राजधानी आहे - अयोध्या. संपूर्ण आर्यावर्तात हे शहर प्रसिद्ध आहे. अयोध्या, जिथे युद्ध होत नाही. श्रेष्ठ नगरी, ज्या नगरीला स्वतः मनू महाराजांनी वसवले आहे.

**अयोध्या नाम नगरी तत्रासील्लोकविश्रुता ।**
**मनुना मानवेंद्रण या पुरी निर्मिता स्वयम् ।।६।।**

(बालकांड / पाचवा सर्ग)

ही नगरी विशाल आहे. अति भव्य आहे. १२ योजन (अर्थात १५० किलोमीटर) लांब आणि ३ योजन (अर्थात ३८ किलोमीटर) रुंद आहे. या नगरीत

विस्तीर्ण राजमार्ग आहेत. वेली, झाडे, वृक्ष,फळं, फुलं यांनी ही नगरी सुशोभित आहे. या नगरीच्या चारी बाजूंनी खोल खंदक तयार केला आहे. या नगराच्या संरक्षणाची पूर्ण व्यवस्था आहे. या नगरीतील लोक उद्यमी आहेत. कलाप्रेमी आहेत. नृत्य, गान, संगीत, नाटक या सर्वांमध्ये परिपूर्ण आहेत. सर्व नागरिक धार्मिक, धर्मशील, संयमी, सदा प्रसन्न असणारे आणि चारित्र्यवान आहेत.

अशी पवित्र आणि संपन्न नगरी ज्या राज्याची राजधानी आहे, अश्या कोशल राज्यावर महापराक्रमी राजा दशरथ राज्य करीत आहे. ज्या प्रकारे आकाशातील साऱ्या नक्षत्र, तारे, चांदण्या यावर चंद्र राज्य करतो, त्याच प्रकारे शीतल, सुखद असे शासन राजा दशरथ यांचे आहे.

**ता पुरी स महातेजा राजा दशरथो महान् ।**
**शशास शमितामित्रो नक्षत्राणीव चंद्रमाः ।।२७।।**

(बालकांड / सहावा सर्ग)

चंडप्रतापी राजा दशरथ, आपल्या अष्टप्रधानां समवेत लोककल्याणकारी राज्य करीत आहेत. त्यांचे सर्व आठही मंत्री, उच्च गुणांनी आणि शुद्ध विचारांनी ओतप्रोत आहेत. हे मंत्री आहेत - धृष्टि, जयंत, विजय, सौराष्ट्र, राष्ट्रवर्धन, धर्मपाल आणि सुमंत्र. यातील सुमंत्र हा अर्थशास्त्राचा अभ्यासक आहे, विशेषज्ञ आहे. आणि राज्यकोषीय व्यवहार सुद्धा बघत आहे.

हे सर्व मंत्री एक विचाराने, एका ध्येयाने, देशहितासाठी भारावून काम करताहेत. हे सर्व विनयशील आहेत. शस्त्रविद्या प्रवीण आहेत. सुदृढ आणि पराक्रमी आहेत. यांच्याशिवाय सुयज्ञ, जाबाली, कश्यप,गौतम, दीर्घायु, मार्कंडेय आणि कात्यायन हे ब्रम्हर्षीसुद्धा राजा दशरथाचे मंत्री आहेत. अशा मंत्र्यांच्या बरोबर, गुणवान राजा दशरथ, कोशल राज्य चालवीत आहे.

**ईदृशैस्तैरमात्यैश्च राजा दशरथोऽनघः ।**
**उपपन्नो गुणोपेतैरन्वशासद् वसुन्धराम् ।।२०।।**

परंतू......

पण आर्यावर्तात सगळं काही कुशल - मंगल चाललेलं नाही. अयोध्या तर सुरक्षित आहे, पण अयोध्येच्या बाहेर, फक्त कोशल राज्यच नव्हे तर, संपूर्ण आर्यावर्तात एक भयंकर दहशत पसरलेली आहे. सज्जनशक्ती भयभीत आहेत. ऋषीमुनींना, ब्रम्हर्षींना यज्ञ करणं कठीण होतंय. कुठल्याही शुभकार्यात असूरी शक्ती विघ्न घालतील याची भीती सतत सगळ्यांच्या मनात आहे.

या दहशतीचा केंद्रबिंदू आहे - रावण. सुदूर दक्षिणेत, सिंहल द्वीपाचा, अर्थात लंकेचा राजा. पुलस्त्य मुनींसारख्या विद्वान ऋषींचा नातू आणि वेद शास्त्र संपन्न विश्रवा चा मुलगा. परम शिवभक्त. परंतु अन्यायी, क्रोधी आणि कपटी राजा, ज्याला सज्जनशक्तीला त्रास देण्यात असुरी आनंद प्राप्त होतोय.

या रावणाने साऱ्या आर्यावर्तात आपले क्षेत्रप तयार करून ठेवले आहेत. त्यांना ठिकठिकाणी नेमलं आहे. हे सगळे क्षेत्रप, दानवी प्रवृत्तीचे, असुरी वृत्तीचे आहेत. नागरिकांचा छळ करताहेत. त्यांच्याकडून धन वसूल करताहेत. सामान्य नागरिकांचं जगणं यांनी अशक्य करून ठेवलं आहे. पूर्ण आर्यावर्तातील सज्जनशक्ती, रावणाच्या या असुरी प्रवृत्तीच्या क्षेत्रपांमुळे भयभीत आहे. अत्यंत दुःखी आहे. कष्टात आहे.

ही सज्जनशक्ती, या सृष्टीच्या पालनकर्त्या, परमपिता परमेश्वराला प्रार्थना करते आहे की, 'रावण नावाचा राक्षस आपल्या कृपाप्रसादाने, स्वतःच्या असीम बलाने, आम्हाला खूप त्रास देतोय. कष्ट देतोय. आमच्यात त्याला हरवण्याची शक्ती नाही. तरी कृपा करून, आपणच काहीतरी करावे.'

**भगवंस्त्वत्प्रसादेन रावणो नाम राक्षसः ।**
**सर्वान् नो बाधते वीर्याच्छासितुं तं न शक्नूमः।।६।।**

स्वर्गात सृष्टीचे पालनकर्ता, परमपिता परमेश्वर, ही प्रार्थना ऐकत आहेत. ते पृथ्वीच्या,

आर्यावर्तासारख्या पवित्र देशात, रावणाने दाही दिशांना केलेला दहशतवाद बघत आहेत. रावणाचा आतंक, एक प्रकाराने, प्रत्यक्ष अनुभवत आहेत. सज्जनशक्तीला होणारे कष्ट, होणारा त्रास पण बघताहेत.

हे सर्व बघून, सृष्टीच्या पालनकर्त्यांना असं वाटतंय की, आर्यावर्तातील नागरिकांनी निर्भय जगायचे असेल तर रावणाचा विनाश अनिवार्य आहे. पण हा विनाश कुठल्याही चमत्काराने होणार नाही, असं परमेश्वरानं ठरवलं आहे. नरसिंह अवतारात चमत्कार आवश्यक होता, कारण हिरण्यकश्यपूमध्ये अशी दानवी शक्ती निर्माण झाली होती, की त्यामुळे त्याला कुठल्याही सामान्य व्यक्तीकडून मृत्यू येणे शक्य नव्हते.

परंतु यावेळी नाही. यावेळी कुठलाही चमत्कार नाही. कारण जर यावेळी पण चमत्काराने रावणाला नष्ट केले तर सज्जनशक्ती निष्क्रिय होईल. भविष्यात कधीही समाजात असुरी प्रवृत्तीने जन्म घेतला तर ही सज्जनशक्ती, परमपिता परमेश्वराच्या कुठल्यातरी अवताराची वाट बघत बसेल. प्रतीक्षा करेल. ती प्रत्यक्ष संघर्ष करणार नाही.

हे योग्य नाही. या सज्जनशक्तीचा आत्मविश्वास जागृत करायला हवा. त्यांच्यात हा विश्वास निर्माण करावा लागेल की 'सारी सज्जनशक्ती जर एकत्र आली, संघटित झाली, तर ती कुठल्याही बलशाली दानवी शक्तीला पराभूत करू शकते'. परमेश्वराचा दैवी अंश यामध्ये माध्यम बनेल, परंतु सारा संघर्ष करेल ती सज्जनशक्ती, अर्थात सज्जन समाज.

बस ठरलं तर मग..! भगवान अवतार नक्की घेतील. पण कुठल्याही चमत्कारांशिवाय. ते संघटित सज्जनशक्तीत देवत्वाचा संचार करण्याचे कार्य करतील. त्याकरता ते माध्यम बनतील, आर्यावर्तातील पवित्र नगरीत, अयोध्येचे चंडप्रतापी राजा दशरथ यांच्या मुलाच्या रूपात. **श्रीरामाच्या रूपात....!**

**– प्रशांत पोळ,**

मोबा. ९४२५१५५५५१

## भावपूर्ण श्रद्धांजली !



महिला सबलीकरणाची चळवळ गेली ३३ वर्षे अखंडपणे चालवणाऱ्या स्वयंसिद्धाच्या संचालिका व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती कांचनताई परुळेकर, वय ७४ यांना दि. २६/३/२०२५ रोजी दुपारी ३ वाजता देवाज्ञा झाली. त्यांना कोल्हापूर चित्पावन संघातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली !

## भावपूर्ण श्रद्धांजली !



कोल्हापूर चित्पावन संघाचे माजी संचालक शशिकांत अच्युत गद्रे काका यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. संघाच्या घटनेचे इंग्रजी भाषेत रूपांतर करून देण्याचे महत्त्वाचे काम संघाचे कार्यवाह कै. द. गो. कानिटकर यांच्या विनंतीनुसार त्यांनी करून दिले होते. त्यांना कोल्हापूर चित्पावन संघातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली!

### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक एकेचाळिसावा)

दुसऱ्या दिवशीची सकाळ उजाडली तीच मोठा उत्साह घेऊन. आज धर्मसभेत जायचं होतं. चौघंही आपली आनंदी योगाभ्यासापासून ते पाठांतरांपर्यंतची सगळी आन्हिकं आटोपून तयार होती. विनायकबुवा आलेच. चौघांनीही त्यांना वंदन करून चौघंही बाहेर पडले. धर्मसभेत आज धर्ममार्तंडांची गर्दी होती. पैठणहून तिथल्या धर्मसभेचे दोन ज्येष्ठ आचार्य, पंडित मोरेश्वरशास्त्री आणि आचार्य बोपदेवाचार्य आले होते. आळंदीचा सगळा ब्रह्मवृंद आज धर्मपीठात हजर होता. विनायकबुवांनी चौघा भावंडांना घेऊन धर्मागारात प्रवेश केला. या चौघांना बघून अनेकांनी कपाळाला आठ्या घातल्या. काहींनी नाकं मुरडली. काहींनी भुवया चढवल्या. तर काहींनी, ''विनायकबुवा, हे पाप या पुण्यस्थानी कशाला घेऊन आलात?'' असं विचारलं, तर काहींनी, ''ही घाण इथं कशाला आणली?'' असं विचारलं.

धर्मसभेत प्रवेश करताना चौघाजणांची मन:स्थिती मोठी विचित्र होती. एक अनामिक भीती, एक विचित्र भय मनांत थैमान घालत होतं. अनेक चांगल्या-वाईट शंका-कुशंकांनी मनाला ग्रासलं होतं. आपला अपमान होणार, तिरस्कार केला जाणार, याची वेदना काळीज कुरतडत होती. तरीही एक अनावर उत्सुकता मनात दाटली होती. 'काय होईल? कसं होईल? काय निर्णय लागेल?' असे अनेक प्रश्न मनांत उद्‌भवत होते. एक अनामिक हुरहूर, एक-एक विचित्र जाणीव मनावर पसरली होती. निवृत्ती-ज्ञानेश्वर, सोपान-मुक्ता सगळ्यांच्या मनात हे भाव रुंजी घालत होते. चौघांनी एकमेकांचे हात घट्ट धरले होते. त्या घट्ट बंधनातून प्रत्येक जण दुसऱ्याला आधार देत होता आणि दुसऱ्याचा आधार घेत होता. तो अतूट स्पर्श दिलासा देतही होता आणि दिलासा मागतही होता.

चौघांना घेऊन विनायकबुवांनी धर्मसभेच्या धर्मगारात प्रवेश केला आणि महाद्वारातून आत थोडंसं पुढं जाऊन उभे राहिले. त्या धर्ममंडपात एक कोपरा रिकामा होता. तिथं पाणी साचलं होतं. विनायकबुवांनी या चौघांना तिथं उभं राहायला सांगितलं. 'कुणाला स्पर्श होणार नाही, याची काळजी घ्या' असं हळूच सांगायला ते विसरले नाहीत. निवृत्तीचा चेहरा गंभीर झाला. ज्ञानेशाच्या भालप्रदेशावर एक आठी उमटली. सोपानानं खालचा ओठ दाताखाली दाबला, तर मुक्तीच्या डोळ्यांत पाणी उभं राहिलं; पण याला पर्याय नव्हता. जे-जे होईल ते पाहावं लागणार होतं, जे-जे घडेल ते सोसावं लागणार होतं. समाजाच्या कठोर नियमांना मनात असो वा नसो, स्वीकारावं लागणार होतं.

धर्मसभा भरली होती. काही नवीन मुद्दे मांडले जात होते. जुनं बदललं जात होतं. नवीन संकेत ठरत होते. जुने पुसले जात होते. आचार्य बोपदेव आणि पंडित मोरेश्वरशास्त्री मार्गदर्शन करत होते. सामाजिक शास्त्राचे काही मुद्दे समजावून देत होते. ब्रह्मसभेत नीरव शांतता होती. झाडाचं पान पडलं, तरी त्याचा आवाज येईल, इतकी प्रगाढ शांतता होती. मुद्दे सांगून संपले, तशी मोरेश्वरशास्त्री बोलू लागले, ''विप्रजन हो ! आजची ही धर्मसभा आपल्या कर्मकांडात होणारी काही स्थित्यंतरे कथन करण्यासाठी बोलावलेली आहे. आता आचार्यांनी जे काही विवेचन केलं आहे, त्याबद्दल किंवा इतर काही शंका असल्यास पुढे येऊन विचारावं !'' त्यांचं हे आवाहन संपते तोच विनायकबुवा पुढे झाले, ''आचार्य

प्रणाम! मी विनायकबुवा बोडस ! मी काही गाऱ्हाणं घेऊन आपल्यासमोर मांडू इच्छितो. अनुमती असावी.'' विनायकबुवांनी वंदन करून आचार्यांना विनंती केली. मोरेश्वरशास्त्री हात उंचावून म्हणाले, ''अनुमती आहे ! बोला बुवा !'' अनुमती मिळताच विनायकबुवांनी निवृत्तीला हातानं पुढं बोलावलं. निवृत्ती पुढे झाला. त्याच्या पाठोपाठ ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताही आले. या चौघांना पाहताच धर्मसभेची शांतता मोडली. ''अरे ही कार्टी इथं कशी आली? आणि कशाला? ही पापाची फळं या पुण्यस्थानी का आलीत? ही धर्म बुडव्याची पोरं इथं का आलीत? यांना आत कुणी येऊ दिलं? यांना आधी इथून बाहेर काढा ! यांना इथून हाकलून द्या ! यांच्यामुळे ही अवघी धर्मसभा बाटेल, विटाळेल ! यांना इथून हाकला ऽ! हाकलून द्या ऽ ऽ! बाहेर काढा ऽऽ! ही चांडाळ आहेत. ही धर्मबुडवी आहेत. हाड ! अरे हाड ऽऽ हाड ऽऽ! हाकला यांना कुणीतरी ! एक वेळ या धर्मसभेत श्वान येऊ शकेल; पण ही चार कार्टी नाहीत. या या हरामखोर विनायक बोडसानं यांना इथं आणलंय ! त्याच्यावरही ग्रामण्य घाला ! बहिष्कार घाला ! समजातली ही घाण इथं आणताना याला काहीच कसं वाटलं नाही? या सगळ्यांना इथून आधी हाकलून द्या !''

इतका वेळ एक निरामय स्तब्धता असलेल्या त्या धर्मपंडितांच्या सभागृहात या चार भावंडांनी प्रवेश केला आणि एकच गदारोळ उठला. जो-तो उठून बोलायला लागला, या चौघा भावंडांना तिथं आलेलं बघून त्या धर्ममार्तंडांच्या सभेत जमलेल्या आळंदीच्या त्या रूढीप्रिय ब्रह्मवृंदाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. चौघांचं इथं येणं हा धर्मावर, धर्माचरणावर, धर्मसभेवर मोठा आघात झाल्या-सारखं वाटायला लागलं. या चौघांच्या इथं येण्याला प्रत्येक जण आक्षेप घेऊ लागला आणि विद्वत्जनांच्या, शास्त्री-पंडितांच्या, आचार्य-गुरुंच्या, धर्मगुरूंच्या त्या सभेत एकच हल्लकल्लोळ माजला.

व्यासपीठावर विराजमान धर्मसभेच्या प्रमुखांनाही कळेना की हे काय चाललंय? तोच आळंदीच्या धर्मपीठाचे प्रमुख आचार्य शंकरशास्त्री सोमण व्यासपीठावर उठून उभे राहिले आणि त्यांनी आवाज उंचावून सर्वांना शांत राहण्याचं आवाहन केलं.

गलका काहीसा शांत झाला; पण ''या घाणेरड्यांना बाहेर काढा'' असे आवाज अधूनमधून उठत होतेच. कालांतरानं तेही शांत झालं. आता सभेची सूत्रं सोमणशास्त्रींच्या हातात आली. पंडित मोरेश्वरशास्त्रींनी सोमणशास्त्रींना विचारलं, 'पंडितजी, हा काय प्रकार आहे? इथं जमलेले सगळे विद्याविभूषित शास्त्री-पंडित असताना अज्ञानी इतरेजनांसारखं वर्तन करताहेत, हा काय प्रकार आहे? असं झालंच तरी काय, ज्यामुळे हे विद्वत्जन असे संतापले आहेत?' मोरेश्वर पंडितांनी विचारलं.

हळू आवाजात सोमणशास्त्रींनी सगळा प्रकार त्यांना कथन केला. मग मात्र सभेची सगळी सूत्रं पंडित मोरेश्वरशास्त्रींनी आपल्या हातात घेतली. तीव्र स्वरात त्यांनी सर्वांना शांत राहण्यास सांगितलं. ''विद्वत्जन हो ! शांत रहा ! गलका करणं, हल्लकल्लोळ माजवणं, आरडाओरडा करणं, ही व्युत्पन्नांची लक्षणं नव्हेत. ज्ञानवंतांची लक्षणं नव्हेत. या धर्मपीठासमोर अनेक न्यायनिवाडे होतात. आजवर झालेले आहेत. यापुढेही होत राहतील. या धर्मसभेपुढे येऊन आपलं गाऱ्हाणं मांडण्याचा अधिकार कोणालाही, अगदी इतरेजनांनाही आहे. मग ग्रामण्यात असली, तरी ही विठ्ठलपंतांचीच मुलं आहेत ना? तेव्हा त्यांचं म्हणणं काय आहे, हे धर्मसभा नक्कीच ऐकेल. तेव्हा सर्वांनी शांत राहावं.'' पंडितजींनी असं आवाहन केल्यावर मात्र मंडळी शांत झाली. आता पंडितजींनी आपला रोख विनायकबुवांकडे वळवला. ''आपण विनायकबुवा ना? आपण बोलावं ! बोला काय गाऱ्हाणं आहे आपलं?'' ''गुरुदेव मी या...''

‘‘भूदेव थांबावं ! आमचं गाऱ्हाणं आम्हालाच मांडू द्यावं, अशी आमची धर्मसभेला विनंती आहे !’’ ज्ञानेशानं विनायकबुवांना मध्येच थांबवलं. मोरेश्वर पंडित आणि आचार्य बोपदेवांचे लक्ष त्या आवाजाच्या दिशेनं गेलं. साधारण सहा वर्षांपासून ते बारा वर्षांपर्यंतच्या वयात असलेली चार मुलं, त्यात तीन मुलं आणि एक मुलगी अशी चौघं एकमेकांचे हात घट्ट धरून उभी होती. चौघांचेही चेहरे तेज:पुंज, पण चेहऱ्यावर पूर्ण चंद्राची शीतलता, डोळे अत्यंत तेजस्वी, पण तान्ह्या बाळाची निरागसता, निर्व्याजता त्यात भरलेली, आवाज खणखणीत, उच्चार स्पष्ट; पण स्वरात अवघ्या विश्वाचं मार्दव भरलेलं. उभं राहण्यातली ऐट तितकीच, पण त्यातली नम्रता लक्षवेधी.

या चार लेकरांना बघून पंडित मोरेश्वरशास्त्री आणि आचार्य बोपदेव स्तिमित झाले. देवी अन्नपूर्णेला दिसलेली ब्रह्मा-विष्णू-महेश यांची बालरूपं अशीच असतील, बोपदेवांच्या मनात आलं, तर खणाचाच; पण ठिकठिकाणी विरलेला, फाटलेला परकर आणि खणाचीच इवलीशी चोळी परिधान करून उभ्या असलेल्या मुक्ताकडे त्यांचं लक्ष गेलं आणि तिचं तेज बघून आपोआप त्यांची मान झुकली. साक्षात आदिमायेचं बालरूप असेच दिसत असेल ! त्यांच्या मनानं घेतलं. त्यांच्याही नकळत ते आसनावरून उठले. त्यांच्या मनातल्या विचारापासून अनभिज्ञ असलेली ही चौघं जण मात्र नतमस्तक होऊन हात जोडून उभी होती आणि या कपाळकरंट्या धर्मबुडव्यांना धर्मसभेच्या बाहेर काढायचं सोडून हे दोघं आचार्य त्यांच्याकडे नुसतं बघत काय बसलेत, हेच तिथं जमलेल्या ब्रह्मवृंदाला कळेना. धर्मगारात मात्र पुन्हा एकदा नीरव शांतता पसरली होती ! अगदी नीरव शांतता. (क्रमश:)

**– सौ. मंजुश्री गोखले,**

मो. ८८०५३५५२००


**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

# गोखले ब्रदर्स


**सराफी दुकान**

**रविवार दि. 4 पुष्य नक्षत्र**
**शनिवार, दि. 31 पुष्य नक्षत्र**

**आपलं दुकान**

**महाद्वार रोडवर, 0231-2546585**


**दिनविशेष (मे २०२५) विश्वावसूनाम संवत्सरे** **सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**
**वैशाख-ज्येष्ठ १९४६** **श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**गुरुवार दि. १ :** महाराष्ट्र दिन, मराठी राजभाषा दिन, कामगार दिन, **सोमवार दि. ५ :** शंकर महाराज पुण्यतिथी, **मंगळवार दि. ६ :** राजर्षी छ.शाहू महा. पुण्यदिन, **गुरुवार दि. ८ :** जागतिक रेड क्रॉस दिन, **सोमवार दि. ११ :** नृसिंह जयंती, मदर्स डे, **सोमवार दि. १२ :** बुद्ध पौर्णिमा, परिचारिका दिन, **बुधवार दि. १४ :** छ.संभाजीराजे जयंती, **शुक्रवार दि. १६ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. १०.१९), **गुरुवार दि. २२ :** संत मुक्ताबाई पुण्यतिथी, **सोमवार दि. २६ :** शनैश्चर जयंती, दर्श भावुका सोमवती अमावास्या, **मंगळवार दि. २७ :** पं. नेहरू पुण्यतिथी, **बुधवार दि. २८ :** स्वा. सावरकर जयंती, **गुरुवार दि. २९ :** महाराणा प्रताप जयंती, **शनिवार दि. ३१ :** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती.


# मुलांचे पान



## » चित्र रंगवा



## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा



# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ७ : ज्ञानयोग**

श्री भगवानुवाच ।

**पृथ्वीचा गंध विषयो । अग्नीच्या ठायी तेज जयो ।**
**जीवाचा जीवपणा ठावो । तपस्वियांचे तप ते मी ।।**
मी़ पुण्य-गंध पृथ्वींत असें अग्नींत उष्णता
प्राणि-मात्रांत आयुष्य तपो-वृद्धांत मी तप ।।९।।

**सर्व भूतांचे बीज होउनी। सर्व वर्तणूक मजपासूनि ।**
**बुद्धिवंताचि बुद्धि आदि करूनी ।**
**तेजास्वियांचे तेज मी ।।**
सर्व भूतांत जें बीज तें मी जाण सनातन ।
बुद्धिमंतांत मी बुद्धि तेजस्व्यांतहि तेज मी ।।१०।।

**बळिवंताचे बळ । काम राग विवर्जित सकळ ।**
**धर्म विरोधी भूति केवळ । काम तो मीच जाण ।।**
वैराग्य-युक्त निष्काम बळवंतांत मी बळ
राहे धरूनि धर्मास ती मी भूतांत वासना ।।११।।

**सात्त्विक राजस तामस भाव । मज पासुनि जाले**
**सर्व । ते आहेत मज आधीनत्व ।**
**तयामाजी मी नाही ।।**
माझ्यांतूनि तिन्ही झाले सात्त्विकादिक भाव ते
परी त्यांत न मी राहें ते चि माझ्यांत राहती ।।१२।।

**त्रिगुण मजपासुनी जालें । तेथुनि हें विश्व रचिलें ।**
**तेणे भुलोनी मज चुकलें । मेणति परम अव्यय ।।**
ह्या गुणात्मक भावांनीं विश्व मोहूनि टाकिलें
ज्यामुळें मी न जाणुं यें गुणातीत सनातन ।।१३।।

**माझिये माया त्रिगुण । त्यजावया आवश्यक जाण ।**
**जे करिती माझे भजन । ते हे माया तरती देखे ।।**
माझी ही त्रिगुणी दैवी माया न तरवे कुणा
कासेस लागले माझ्या ते चि जाती तरूनियां।।१४।।

**पापी अथवा मूर्खजन । ते मज नेणती अधम जाण ।**
**माये करूनी हारपलें त्याचे ज्ञान ।**
**ते असूर भावे आश्रयो करिती ।।**
हीन मूड दुराचारी माझा आश्रय सोडिती
मायेनें भ्रांत होऊनि आसुरी भाव जोडिती ।।१५।।

**लोक चतुर्विध भजती मज । अर्जुना जे नर आहे ती**
**सकृताचे बीज । तत्त्वज्ञान जाणुनी इच्छिती सहज ।**
**दु:खी अर्थी कामी एक ज्ञानी जाण ।।**
भक्त चौघे सदाचारी भजती मज अर्जुना
ज्ञानी तसे चि जिज्ञासु हितार्थी आणि
विठ्ठल।।१६।।

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

# ब्राह्मण आणि सरकारी अनुदान

**भाग ४**

आत्तापर्यंत आपण, उच्च दर्जाचे शिक्षण आणि उच्च सरकारी नोकऱ्या मिळवण्याकरता, अमृत संस्थेकडून मिळणारे प्रोत्साहन याची माहिती लेख मला क्रमांक २ आणि ३ मधून घेतली. पण बहुतांश लोकांकडे इतकी उच्च दर्जाची क्षमता नसते. पण त्यांनाही चरितार्थाकरता काहीतरी उद्योग/ व्यवसाय करावा लागतो. त्यांच्याकरताही अमृतच्या खालील प्रमाणे वेगवेगळ्या योजना आहेत. अर्थात आर्थिक दृष्ट्या दुर्बल ब्राह्मण या योजनांचा लाभ घेऊ शकतात.

**१) आर्थिक विकासाकरीता स्वयंरोजगार प्रोत्साहन व प्रशिक्षण कार्यक्रम योजना माहिती**

**योजनेचा उद्देश :-**

राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील अमृतच्या लक्षित गटातील जातीच्या उमेदवारांना रोजगार निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे दृष्टीने स्वयंरोजगार प्रशिक्षण देणे. उद्दिष्टपूर्तीसाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम घेण्यात येतील.

१. लाभार्थ्यांचे स्वयंरोजगारासाठी निवड आणि प्रशिक्षण.

२. व्यावसायिक उद्योजक तयार करण्यासाठी ऑफलाईन आणि ऑनलाईन सर्वंकष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणे.

३. या व्यावसायिकांच्या प्रशिक्षणासाठी ॲप आणि प्रत्यक्ष उद्योग सुरू करण्यासाठी पूरक समन्वय यंत्रणा यांची उभारणी करणे.

४. व्यवसाय सुरू करण्यासाठी संबंधित लाथार्थ्यां-कडून पूरक कागदपत्रांची पूर्तता करून घेणे.

५. व्यवसाय सुरू करण्यापूर्वी लाभार्थ्यांना व्यवसाय शिक्षणाकरता इंटर्नशिप उपलब्ध करून देणे.

६. व्यवसाय सुरू करण्याकरता कर्जाच्या उपलब्धतेसाठी सरकारी योजना, संस्था अगर बँक यांच्याशी समन्वय साधून कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणे.

७. लाभार्थ्यांच्या व्यवसाय प्रसिद्धीसाठी त्यांना डिजिटल मार्केटिंगचे प्रशिक्षण देणे.

८. लाभार्थ्याने सुरू केलेल्या व्यवसायाच्या प्रगतीचा तीन महिने मागोवा घेणे आणि या कालावधीत समन्वयातून त्यांच्या अडचणींचे निरसन करून देणे व व्यवसाय वृध्दी होत असल्याची खात्री करणे.

**योजनेचा लक्ष गट :-**

महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग / संस्था / महामंडळामार्फत योजनांचा लाभ मिळत नाही अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अमृतच्या लक्षित गटातील जातीचे युवक, युवती जे सदर प्रशिक्षणासाठी घेण्यास इच्छुक आहेत असे उमेदवार .

**लाभार्थी निवड निकष :-**

१. अमृत संस्थेच्या सर्वसाधारण लाभार्थी निकषांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

२. लाभार्थ्यांचे वय १८ ते ६० वर्ष दरम्यान असावे

३. या योजनेतील लाभार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या सदर योजनेसारख्या योजनेमध्ये लाभ घेतलेला नसावा

**लाभासाठी अर्ज करण्याची पध्दत :-**

योजनेसाठी अमृत संस्थेकडून व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल. वर नमूद अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या अमृतच्या लक्षित लाभार्थी गटातील इच्छुक अर्जदारांनी विहित नमुन्यामध्ये विहित मुदतीत या योजनेच्या अंमलबजावणी करिता नियुक्त केलेल्या संस्थेकडे ऑनलाईन/ वर नमूद अटी व

शर्ती मध्ये पात्र ठरणारे लाभार्थी यांनी विहीत नमुन्यामध्ये या योजनेसाठी निश्चित करण्यात येणाऱ्या एजन्सीकडे ऑफलाईन/ ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील.

**लाभार्थी निवड प्रक्रिया :–**

प्राप्त अर्जांची अमृतच्या छाननी निकषांनुसार अमृतद्वारा गठीत छाननी समितीद्वारा छाननी करण्यात येईल. त्यात पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची लाभार्थी म्हणून निवड करण्यात येईल. मा.व्यवस्थापकीय संचालक, अमृत यांचे मान्यतेने लाभार्थी यादी अंतिम करण्यात येईल.

**योजने अंतर्गत लाभाचे स्वरूप :–**

या योजनेत लाभार्थ्यास कोणताही थेट लाभ अनुज्ञेय नाही. ज्या संस्थेमार्फत प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जाईल त्यांना प्रती प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण खर्च अनुज्ञेय राहील. यासह प्रशिक्षणाचे स्वरूप यामध्ये निर्देश केलेल्या सर्व उपक्रमांचा खर्च यांचा या मध्ये समावेश राहील.

या योजनेत आर्थिक सहाय्याची तरतूद नाही पण या योजनेमध्ये सहभागी झालेल्या लोकांना अमृतच्या इतर योजनांमध्ये प्राधान्य दिले जाईल .

**२) संगणक टंकलेखन व लघुलेखन प्रशिक्षण योजना**

**योजनेचा उद्देश :–**

शासकीय संगणक टंकलेखन बेसिक कोर्स प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व ऑनलाईन लघुलेखन परीक्षेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील अमृतच्या लक्षित गटातील जातीच्या आर्थिक दुर्बल घटकातील अमृत उमेदवारांना उद्योगाभिमुख स्वयंरोजगार व रोजगारक्षम बनविणे.

**अमृतचा लक्ष गट :–**

खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग / संस्था / महामंडळा मार्फत समकक्ष योजनाचा लाभ मिळत नाही, अशा खुल्या प्रवर्गातील अमृतच्या लक्षीत गटातील जातींचा, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थी, युवक, युवती जे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या शासकीय संगणक टंकलेखन बेसिक कोर्स प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व ऑनलाईन लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत असे उमेदवार.

**लाभार्थी पात्रता निकष :–**

१. अमृत संस्थेच्या सर्वसाधारण लाभार्थी निकषांची पूर्तता करणे बंधनकारक आहे.
२. अर्जदाराने या परीक्षेसाठी कोणत्याही संस्थेकडून प्रोत्साहनपर अर्थसहाय्य घेतले नसल्याचे स्वयंघोषणापत्र व संस्था चालकांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
३. अर्जदाराने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या (MSCE) शासकीय संगणक टंकलेखन बेसिक कोर्स प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व ऑनलाईन लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण झालेल्या निकालाची प्रत स्वस्वाक्षरीत प्रत सादर करणे बंधनकारक राहील.
४. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या शासनमान्य टंकलेखन संस्था मध्ये अभ्यासक्रमासाठी जमा केलेल्या फी / शुल्काची स्वस्वाक्षरीत (Self-attested) पावती आवश्यक आहे.
५. उमेदवाराच्या वैयक्तिक आधार संलग्न बँक खात्याचा तपशिल (बँकेचे नाव, शाखा, खाते क्रमांक, IFSC कोड) व रद्द केलेल्या चेकची प्रत जोडावी.

**लाभासाठी अर्ज करण्याची पध्दत :–**

अमृतच्या लाभार्थी निकषांची पूर्तता करणाऱ्या अर्जदारांनी विहित नमुन्यामध्ये अमृत संस्थेच्या www.mahaamrut.org.in व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेत www.mscepune.in स्थळावर ऑनलाईन अर्ज करावा. त्यासोबत आवश्यक सर्व कागदपत्रे / दस्तऐवज अपलोड करावेत. अर्जाची एक प्रत आवश्यक कागदपत्रांसह स्वस्वाक्षरीत

(Self-attested) करून विहित मुदतीत अमृतच्या कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील. योजनेच्या आर्थिक मर्यादेत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून प्राप्त होणाऱ्या पात्र उमेदवारांना योजनेचा लाभ देण्यात येईल.

**लाभाचे स्वरूप :–**

१. जे उमेदवार महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची शासकीय संगणक टंकलेखन बेसिक कोर्स प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) (कॉम्पुटर टायपिंग मराठी, हिंदी, इंग्रजी ३० व ४० शब्द प्रति मिनिट) उत्तीर्ण होतील त्यांना एकरकमी रक्कम रु.६,५००/– (अक्षरी रुपये सहा हजार पाचशे फक्त) प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील.

२. जे उमेदवार महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची ऑनलाईन लघुलेखन (मराठी व हिंदी ६०, ८०, १०० व १२० शब्द प्रति मिनिट तसेच, इंग्रजी लघुलेखन ६०, ८०, १००, १२०, १३०, १४०, १५० व १६० शब्द प्रति मिनिट) परीक्षा उत्तीर्ण होतील त्यांना एकरकमी रक्कम रु.५,३००/– (अक्षरी रुपये. पाच हजार तीनशे फक्त) प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील.

३. सदर प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा केले जाईल.

४. या व्यतिरिक्त कोणतेही शुल्क लाभासाठी अनुज्ञेय राहणार नाही.

या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी उमेदवार कमीकमी १० वी उत्तीर्ण असणे जरुरीचे आहे . शिवाय एका वेळी दोन परीक्षा उत्तीर्ण झाल्यास दोन वेळा लाभ मिळेल .

**३) कृषी उत्पन्न आधारीत उद्योग सुरू करण्याचे प्रशिक्षण योजना :– योजनेचा उद्देश :–**

अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांना कृषि उत्पन्न आधारित उद्योगासाठी प्रोत्साहन देणे व त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देणे.

**अमृतचा लक्ष गट :–**

अमृतच्या लक्षित गटातील जातीचे खालील प्रकारातील उमेदवार – १) एकल शेतकरी, २) शेतकऱ्यांचा गट, ३) शेतकरी उत्पादक संघ, ४) बचत गट, ५) सहकारी संस्था, ६) शेती विषयक कृषि उद्योग करण्यास इच्छुक असलेले उमेदवार

**लाभार्थी निकष :–**

१. अर्जदाराने अमृत संस्थेच्या सर्वसाधारण लाभार्थी निकषांची पूर्तता करणे बंधनकारक आहे.

२. अर्जदाराचे वय १८ ते ६० वर्षे दरम्यान असावे.

३. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अमृतच्या लक्षित गटातील अर्जदार वैयक्तिक, शेतकरी उत्पादक संघ (FPO) / स्वयंसहाय्य गट / बचत गट (SHG) अथवा कंपनी / फर्म / सहकारी संस्था

४. शेतकऱ्यांना प्राधान्य.

**लाभासाठी अर्ज करण्याची पध्दत :–**

योजनेसाठी नमूद अटी व शर्ती मध्ये पात्र ठरणारे इच्छुक उमेदवार यांनी विहीत नमुन्यामध्ये या योजनेसाठी अमृत संस्थेने निश्चित केलेल्या एजन्सीकडे / अमृतकडे www.mahaamrut.org.in वर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. जाहिरात प्रसिद्धीनंतर प्रथम येणा–यांस प्राधान्य राहील. तथापि, लाभार्थी निवड छाननी समितीच्या अंतिम मान्यतेच्या अधीन राहून असेल.

**लाभार्थी निवड प्रक्रिया :–**

प्राप्त अर्जाची अमृतच्या छाननी निकषांनुसार अमृतद्वारा गठीत छाननी समितीद्वारा छाननी करण्यात येईल. त्यात पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची लाभार्थी म्हणून निवड करण्यात येईल. मा.व्यवस्थापकीय संचालक, अमृत यांचे मान्यतेने लाभार्थी यादी अंतिम करण्यात येईल.

**योजनेअंतर्गत लाभाचे स्वरूप :–**

या योजनेत लाभार्थ्यास प्रशिक्षणाशिवाय इतर कोणताही थेट लाभ अनुज्ञेय नाही.

या योजनेमध्ये शेती व्यवसाय असणाऱ्याना प्राधान्य दिले जाईल. पण शेतीत स्वारस्य असणारे सुद्धा सहभागी होऊ शकतात. आर्थिक सहाय्याची तरतूद नाही.

**४) कृषी क्षेत्रात ड्रोन वापरण्याचे प्रशिक्षणाची योजना : योजनेचा उद्देश :–**

महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवकांना विशेषत: ग्रामीण क्षेत्रात स्वयंरोजगार व रोजगार निर्मिती करणारे प्रशिक्षण देणे.

**लाभार्थी लक्ष गट :–**

महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग / संस्था / महामंडळामार्फत योजनांचा लाभ मिळत नाही अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अमृतच्या लक्षित गटातील जातीचे युवक, युवती.

**लाभार्थी पात्रता निकष :–**

१. अर्जदाराने अमृत संस्थेच्या सर्वसाधारण लाभार्थी निकषांची पूर्तता करणे बंधनकारक आहे.

२. प्रशिक्षणार्थी लाभार्थीचे वय: १८ ते ५५ वर्षे असावे.

३. उमेदवाराची शैक्षणिक पात्रता: किमान १० वी उत्तीर्ण असावा.

४. शेतकरी कुटुंबातील उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

५. अर्जदाराचा नोंदणीकृत वैद्यकीय अधिकारी यांचा फिटनेस दाखला आवश्यक.

(वैद्यकीय दाखल्याचा नमुना डाऊनलोड करून वैद्यकीय अधिकारी यांचे स्वाक्षरीनंतर संकेतस्थळावर अपलोड करावा)

६. लाभार्थ्याकडे भारतीय पारपत्र (पासपोर्ट)/ वाहन चालक परवाना/ शिधापत्रिका यापैकी उपलब्ध दस्तऐवजाची स्वस्वाक्षरीत प्रत जोडावी.

७. उमेदवाराच्या स्वत:च्या आधार संलग्न बँक खात्याचा तपशिल बँकेचे नाव, शाखेचे नाव, बँक खाते क्रमांक, खाते प्रकार, IFSC कोड

**लाभासाठी अर्ज करण्याची पध्दत :–**

अमृत संस्थेच्या सर्वसाधारण लाभार्थी निकषांची पूर्तता करणाऱ्या इच्छुक अर्जदारांनी विहित नमुन्यामध्ये, विहित मुदतीत अमृतच्या संकेतस्थळावर www.mahaamrut.org.in ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच, अर्जाची एक हार्ड प्रिंट स्वाक्षरीत करून आवश्यक सर्व दस्तऐवज स्वसाक्षांकित करून अमृतच्या कार्यालयास दिलेल्या विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक आहे.

**योजने अंतर्गत लाभाचे स्वरूप :–**

या प्रशिक्षणासाठी अमृत संस्थेने प्रायोजित केलेल्या प्रशिक्षणार्थी चे प्रशिक्षण शुल्क रु. ३५०००/– (अक्षरी रुपये पस्तीस हजार फक्त) प्रति प्रशिक्षणार्थी थेट महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना अदा करण्यात येईल. ज्या प्रशिक्षणार्थीनी पूर्णवेळ निवासी प्रशिक्षण घेतले असेल त्यांना निवास व भोजनाच्या खर्चासाठी प्रति प्रशिक्षणार्थी रु. ५०००/– (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) प्रमाणे रक्कम थेट लाभार्थ्यांच्या नावे असलेल्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

या योजनेत स्वत:चा ड्रोन असणे आवश्यक नाही. ड्रोन खरेदीसाठी सहाय्य नाही. उंमेदवार कमीतकमी १० वी उत्तीर्ण असणे जरुरीचे आहे.

माझे सगळ्यांना कळकळीचे आवाहन आहे की आपल्या ज्ञाती बांधवांनी वरील योजनांचा लाभ घ्यावा .

**– श्रीकांत शिंत्रे ,**

मोबा. ९६१९१९६७०५

# नासिक.. पंचवटीच्या काळाराम मंदिराचा अचंबित करणारा इतिहास...





बाजीराव पेशवे मोहिमेवर होते,त्यांनी नासिरजंगाचा पराभव करुन, त्यास शरण येण्यास भाग पाडले. पेशवे पुण्यास परत न येता खरगोण परीसरात गेले. जहागिरीची काही व्यवस्था लावून नर्मदेच्या किनारी रावेरखेडी येथे आले. त्यांना खूप थकवा जाणवत होता. मस्तानीच्या आठवणींनी मन कासावीस होत होते. अंगात ताप असतानाच नदीच्या पाण्यात सूर मारला, प्रचंड भोवऱ्यात सापडले, भोवऱ्यातून बाहेर तर काढले, पण मृत्यूच्या कराल दाढेतून सुटू शकले नाही. बाजीराव पेशव्यांचे ज्येष्ठ पुत्र नानासाहेब पेशवे होते. त्यांची पत्नी गोपिकाबाई, पेशव्यांचे सावकार भिकाजीपंत गोखले( रास्ते) यांची कन्या होती.

शाहू महाराजांनी बाजीराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर नानासाहेबांना पेशवेपद दिले. गोपिका आता श्रीमंत गोपिकाबाई पेशवे झाल्या. त्यांना विश्वास, माधव, नारायण हे तीन मुले झाली. विश्वासराव पानिपतच्या युध्दात मारला गेला. त्यानंतर थोड्या दिवसातच क्षयाच्या आजाराने नानासाहेबांचा मृत्यू झाला. नानासाहेबांनंतर पेशवेपद कोवळ्या वयात द्वितीय पुत्र माधवरावांना देण्यात आले. माधवराव पेशवे कारभार व्यवस्थित चालवत होते. रघुनाथराव पेशवे नानासाहेबांचे लहान भाऊ होते, ते आधी निजामाला मदत मागायला गेले होते, पण नंतर त्यांनी निजामाशी संबंध तोडून टाकले. निजामाने चिडून माधवराव पेशवे, रघुनाथ पेशवे नसताना पुणे लुटले, पण निजामाला मदत करणारे आप्तस्वकीय म्हणजे मल्हारराव रास्ते, त्यांच्या आईचे सख्खे भाऊ होते, त्यानी त्यांच्या मामांना ५००० रुपये दंड केला. गोपिकाबाई माधवराव पेशव्यांना म्हणाल्या, ‘‘तू नातं विसरलास! नशीब आपले नाते नाही विसरला! दंड मागे घे !’’ त्यांना वाटले आपला शब्द मोडण्याची, मुलाची हिंमत होणार नाही. पेशवे म्हणाले, आम्ही जेव्हा पेशवे पदावर बसून निर्णय देतो, तेव्हा तो पेशव्यांचा निर्णय असतो, त्यावेळेस कोणतही नाते लक्षात घेतले जात नाही.ते त्यांच्या निर्णयावर ठाम राहिले.

जिथे आमच्या शब्दाला मान नाही, तेथे आम्ही पाणी सुध्दा पिणार नाही. रास्ते घराण्याचा अपमान सहन करणार नाही. आम्ही आता गंगापूर गावी जावून रहाण्याचा निर्णय घेतला आहे. गोपिकाबाई म्हणाल्या.

गोपिकाबाईंचा हट्टी, करारी, स्वाभिमानी स्वभाव माधवरावांना माहित होता.त्यांचा शब्द

म्हणजे दगडावरची रेघ. त्यांनी गोपिकाबाईंबरोबर त्यांचे लहान बंधू गंगाधरपंत यांना त्यांची काळजी घेण्यासाठी पाठवले. त्या नाशिकला निघाल्या तेव्हा माधवराव पेशव्यांचा भावनेचा बांध फुटला. ते हमसाहमशी रडू लागले. पेशवाईचे वैभव सोडून, मुलाला सोडून आई गंगापूर गावी आल्या.

त्र्यंबकेश्वर मंदिराचे बांधकाम श्रीमंत नानासाहेब पेशव्यांनी सुरू करून ५- ६ वर्षे झाली होती. त्याला पूर्ण होण्यास दहा वर्ष तरी लागणार होती.

नानासाहेबांचे भाऊ, रघुनाथ पेशव्यांना पेशवे पदाची इच्छा होती, ती काही पुरी झाली नाही. ते पुणे सोडून नाशिक जवळच तीन कोस अंतरावर, चावंडस या गोदातीरावरच्या गावी रहायला आले होते. आनंदीबाईंनी गावातील श्री गणेशाला नवस केला होता. मुलगा होऊ दे, मोठे मंदिर बांधू. नवस फळास आला, मुलगा झाला. सगळीकडे आनंदी आनंद झाला. म्हणून गावातील लोकांच्या संमतीने रघुनाथरावांनी 'चावंडस' हे गावाचे नाव बदलून 'आनंदवल्ली' ठेवले. आनंदीबाईंच्या नावावरून पण 'आनंदवल्ली' नाव पडले असे मानतात. गावातील श्री गणपती नवसाला पावतो म्हणून सर्वजण त्या गणपतीला नवश्या गणपती म्हणू लागले. गोपिकाबाईंना औषधाची बरीच माहिती होती.

गोपिकाबाई पंचवटीत गेल्या. तेथे त्यांना लाकडांच्या ओंडक्यांनी व फळ्यांनी बांधलेले प्रभू रामचंद्रांचे लहानसे मंदिर पहावयास मिळाले. आत राम, सीता व लक्ष्मण यांच्या तीन काळ्या पाषाणातील सुबक सुरेख मूर्ती होत्या. त्या त्यांचे बंधू गंगाधरपंतांना म्हणाल्या, दादा ताबडतोब सरदार रंगराव ओढेकरांना बोलावून घ्या.

थोड्याच वेळात ते तेथे अश्वावर स्वार होऊन हजर झाले. त्या म्हणाल्या, आम्हाला या मूर्तीबद्दल व मंदिराबद्दल माहिती हवी आहे.

बाईसाहेब येथून जवळच तपोवन आहे, नाथपंथी साधूंचे तेथे आखाडे, झोपड्या आहेत. स्नानासाठी जवळ असलेल्या अरुणा व वरुणा नद्यांच्या संगमावर जातात. संगमावर स्नान करत असतांना एका साधूच्या पायाला कठीण काहीतरी लागले म्हणून त्याने पाण्यात बुडी मारली, तेव्हा स्वयंभू, रामाची मूर्ती व अजून शोध घेतल्यावर सीता, लक्ष्मणाची मूर्ती मिळाल्या. त्यांनी जवळचे ओंडके, फळ्या जमा करुन हे मंदीर उभे केले.

त्या म्हणाल्या, ''येथे प्रभू रामचंद्रांचे भव्य मंदिर झाले पाहिजे !''

रंगराव म्हणाले, ''त्र्यंबकेश्वराच्या मंदिरा सारखे प्रभू श्रीरामाचे मंदिर येथे उभारू. त्यासाठी लागणारा खर्च आम्ही करू.''

रंगराव ओढेकर मूळ तंजावरचे होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे सावत्र बंधू व्यंकोजी महाराज यांच्या दरबारात ते सरदार होते. ते जेव्हा उत्तरेच्या मोहिमेवर गेले होते तेव्हा त्यांनी तलवारीने पराक्रम तर केलाच, अनेक महाराजांना पराभूत करून जडजवाहर, संपत्ती हत्ती, घोड्यावरून आणले. श्रीमंत माधवराव पेशव्यांनी रंगरावांचा पराक्रम व प्रामाणिकपणा पाहून, त्यातील अर्धी संपत्ती त्यांना बक्षिसी म्हणून दिली तसेच नासिक परगण्यातील 'ओढा', तसेच कोपरगाव परगण्यातील 'कुंभारी' ही गावही जहांगिरी म्हणून बहाल केली. त्यांनी ओढा या गावी भव्य वाडा बांधला.वाडा म्हणजे चारही बाजूने भक्कम तटबंदी, चार भक्कम बुरुज असलेला किल्लाच. ओढा या गावालाही भक्कम तटबंदी केलेली आहे. त्यांच्याजवळ २५ हत्ती होते. सन १७७८ मधे, सरदार रंगरावांनी श्रीरामाचे मंदिर बांधण्याची जबाबदारी स्वीकारून कामाला सुरुवातही केली. मोठमोठ्या कढयात दूध उकळायला ठेवून त्यात मोठमोठे दगड टाकायचे, खूप वेळ उकळल्यावर त्याला कारागीर व सरदार रंगराव तपासून पहायचे. कारण प्रत्येक

दगडावर कोरीव काम होणार होते. छिन्नी हातोड्यांच्या सहाय्याने कोरीव काम करताना दगड फूट नये म्हणून दगडाची मजबूती तपासून पहात होते. ते दगड आठ कोस दूर असलेल्या रामशेजच्या डोंगरावरून  बैलगाड्यांत ठेवत, त्या बैलगाड्या हत्ती ओढत  आणत होते.

प्रभू रामचंद्र वनवासातील दिवसात सीतामाई व बंधू लक्ष्मण यासह पर्णकुटी रहायला येण्यापूर्वी याच डोंगरातील गुहेत वास्तव्यास होते. म्हणून त्या डोंगराचे नाव 'रामशेज' पडले.

मंदिराच्या घुमटाचे काम सुरू झाले, तेव्हा घुमटाला लागणारे कोरीव काम केलेले दगड हत्तीच्या पाठीवरून बांधकामापर्यंत आणून मग दोराला बांधून वर उचलत होते. दोन कामगार खालून वर आधार देत होते, तर वरती चार कामगार दगड योग्य ठिकाणी ठेवत होते. त्या कामगारांपैकी एक कामगार खाली हत्तीवर कोसळला त्या पाठोपाठ कोरीव काम केलेला दगडही त्याच्या अंगावर कोसळला. त्या कामगाराचा चेंदामेंदा झाला होता.

मंदिराच्या पायाच्या वरती मागील बाजूला दोन हत्तींच्या मूर्ती ठेवलेल्या होत्या त्या काढून एका हत्तीवर त्या कामगाराची मूर्ती ठेवून त्या कामगाराचे स्मारक बनवले आहे.


मंदिराच्या गाभाऱ्यात कोरीव काम केले आहे. खांबांवर पण सुंदर कोरीव काम केलेले आहे. मंदिराच्या भोवती तटबंदी आहे, पूर्व, दक्षिण, उत्तर दरवाजे आहेत.

राम, लक्ष्मण व सीतामाई तिघांच्या तर मूर्त्या होत्या पण हनुमानाची मूर्ती सापडली नव्हती. एका कारागीराने काळ्या दगडातील हनुमानाची मूर्ती घडवली.मंदिरासमोर असलेल्या बैठ्या सभामंडपात ती हनुमानाची मूर्ती ठेवलेली आहे . सभामंडपात चाळीस खांब आहेत.

मंदिराच्या चारही बाजूने ओवऱ्या बांधलेल्या आहेत.ओवऱ्यांच्या कमानींची कलाकुसर केलेली आहे.मानवजन्म ८४ योनीतून फिरून प्राप्त होतो म्हणून ओवऱ्यांची संख्या ८४ आहे. चौदा वर्षे रामाला वनवासात रहावे लागले त्याची आठवण म्हणून मंदिरात जाण्यासाठी चौदा पायऱ्या चढून जावे लागते. श्रीराम, सीतामाई व लक्ष्मण यांच्या मूर्तींची जागा अशी ठेवलेली आहे की, मेष व तूळ संक्रांतीच्या दिवशी सूर्योदयाची कोवळी किरणे प्रभू रामचंद्रांच्या मुखकमलावरच पडतात. रंगराव ओढेकरांनी स्वत:चे त्या काळातील तेविस लाख खर्चून काळ्या पाषाणातून अप्रतिम कलाकुसरीने बारा वर्षे अथक परिश्रम घेऊन काळाराम मंदिर उभारलेले आहे. असे नाशिकचे 'काळाराम मंदिर' १७९० मधे बांधून पूर्ण झाले.

(आंतरजालावरून साभार)

## भावपूर्ण श्रद्धांजली !



**श्री. नंदकुमार शिवराम गद्रे**

गद्रे कुटुंबाचे तसेच कोल्हापूर चित्पावन संघाचेही हितचिंतक, दामोदर शिवराम आणि कंपनीचे माजी भागीदार व डायरेक्टर श्री. नंदकुमार शिवराम गद्रे (वय ८२) यांचे दि. ८ एप्रिल २०२५ रोजी आकस्मित दु:खद निधन झाले. त्यांना कोल्हापूर चित्पावन संघातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली !

# स्वयंसिद्धा - एका तेजस्वी मशालीची गाथा

गेल्या काही दशकांमध्ये महिला आरक्षण, महिला सक्षमीकरण आणि स्त्रीमुक्ती यांसारखे शब्द चर्चेत राहिले आहेत. मात्र, महिलांचे खरे सक्षमीकरण केवळ सवलतींनी होत नाही, तर त्यांच्या आत्मविश्वासाच्या जागृतीतून आणि आर्थिक स्वावलंबनातून होते. आणि याच आत्मनिर्भरतेचा दीप स्त्रियांमध्ये प्रज्वलित करणाऱ्या काही थोडक्याच व्यक्तींपैकी एक म्हणजे कांचनताई परुळेकर. माझ्या कांचन आत्या. माझे पप्पा आजोबा ज्यांना सगळे काकाजी म्हणून ओळखतात यांच्या त्या मानस कन्या.

त्या सुरुवातीपासूनच अतिशय नीडर, बेधडक आणि आत्मविश्वासाने ओतप्रोत भरलेल्या. बेस्ट एनसीसी कॅडेट, बेस्ट शूटर, जे काही करायचं ते झोकून देऊन करायचं ही त्यांची वृत्ती.

कांचनताईंनी कोल्हापुरात सुरू केलेली स्वयंसिद्धा ही केवळ एक संस्था नव्हे , तर महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्याची एक चळवळ आहे. घरातील जबाबदाऱ्या सांभाळतानाच काहीतरी स्वतःचे करावे, असा विचार घेऊन अनेक स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. कांचनताईंनी त्यांना केवळ मार्गदर्शनच केले नाही, तर त्यांचा आत्मविश्वासही जागवला. प्रारंभी हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमात महिलांच्या वस्तू विकण्यासाठी स्टॉल लावण्याची संधी निर्माण करण्यात आली. याला उत्तम प्रतिसाद मिळत गेला, आणि पुढे दर बुधवारी आठवडी बाजार सुरू झाला. या बाजारात विक्री करणाऱ्या छोट्या उद्योजिकांची संख्या शेकड्यांतून हजारोंवर पोहोचली. महिला आर्थिक-दृष्ट्या सक्षम झाल्या की, त्या स्वतःच्या निर्णयांवर ठाम राहू लागतात, असा कांचन आत्यांचा विश्वास.

ही चळवळ म्हणजे फक्त स्वयंरोजगार पुरवणारी संस्था नाही, तर एक आत्मसन्मान जागवणारे व्यासपीठ आहे . कांचन आत्यांनी हेच शिकवले की, स्त्री ही केवळ कर्तव्याची सावली नव्हे, तर कर्तृत्वाचा तळपता सूर्य आहे.

कांचन आत्यांची महिला सक्षमीकरणा विषयीची एक साधी, पण प्रभावी व्याख्या मी करू शकते, हा आत्मविश्वास निर्माण करणे म्हणजे सक्षमीकरण! सोपं वाटतं ना? पण ते सत्यात उतरवलं त्यांनी.

त्यांचं म्हणणं हे की, घराच्या चौकटीत राहूनही स्त्रिया मोठे काम करू शकतात. प्रश्न संधीचा नसतो, प्रश्न मानसिकतेचा असतो! आणि म्हणूनच त्यांनी केवळ उद्योग-व्यवसाय नव्हे, तर महिलांच्या मनातील न्यूनगंडही दूर करण्याचे कार्य केले. कांचन आत्यांचं कार्य लिहायला बसलं तर ते एवढ्याशा लेखात सामावणे शक्य नाही. त्यामुळे सारे लिहीत बसत नाही.

त्यांच्या वाटेवर अडथळे होते, पण त्या थांबल्या नाहीत. त्या महिला सबलीकरणाच्या चळवळीत झोकून देऊन काम करत असतानाच, त्यांच्या शरीराला कॅन्सरने ग्रासले. पण जशी त्यांनी समाजातील अडथळ्यांवर मात केली, तशीच त्या आजाराशीही झुंजारपणे झुंजत राहिल्या. अखेरच्या क्षणापर्यंत त्या इतरांना धीर देत राहिल्या. कधीही हतबल न होता, स्वतःच्या जीवनाची मशाल तेजस्वी ठेवली.

आणि आज ती मशाल मालवली. खरंच का? मी तर म्हणेन नाही. कांचन आत्या आता पार्थिव रूपाने राहिल्या नाहीत, पण त्यांचा प्रकाश मावळलेला नाही. त्यांच्या कार्याने उभ्या केलेल्या हजारो महिलांच्या डोळ्यांत आता आत्मविश्वासाची ज्योत झळकत आहे. कांचन आत्यांनी सुरू केलेली चळवळ आजही चालू आहे, आणि प्रत्येक स्वयंसिद्ध स्त्रीच्या कर्तृत्वात त्या जिवंत आहेत.

कांचन आत्यांच्या देहाचा अंत झाला असेल, पण त्या एका प्रवासाचा शेवट नाही, तर हजारो प्रवासांचा आरंभ आहेत.

त्यांच्या कार्याला आणि त्यांच्या स्मृतीला शतशः नमन ! श्रद्धांजली ! कांचन आत्या, तुमची मशाल आजही हजारो हातांमध्ये उजळत आहे आणि तशी पुढेही उजळत राहील !

– **रमा जाधव**, मोबा. ८००७९९७२२३

# चित्पावन संघातर्फे फळ प्रक्रिया कार्यशाळा संपन्न





सोमवार, दि.२३/०३/२०२५ रोजी आपल्या संघातर्फे महिलांसाठी ३ तासाची फळ प्रक्रिया या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. सौ. संगीता संजय आपटे ह्यांनी सर्वांचं स्वागत केले. सौ. अश्विनी प्रसाद भिडे ह्यांनी प्रशिक्षिका सौ. मीनल भोसले यांचा परिचय करून दिला. मीनल भोसले ताईंनी व्यवसायिक दृष्ट्या पदार्थ कसे करायचे याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. तसेच महिलांच्या शंकांचे निरसन केले. ३० महिला प्रशिक्षणासाठी उपस्थित होत्या. कार्यक्रम अतिशय उत्तम झाला. सौ. अर्चना दातार यांनी आभार प्रदर्शन केले.

# भगवान श्री परशुराम जयंती उत्सव - २०२५



नमस्कार मंडळी,

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी भगवान श्री परशुराम जयंती उत्सव मंगळवार दि. २९ एप्रिल, २०२५ रोजी सायं. ५.०० वा. ब्रह्मवृंदांच्या मंत्रोच्चारात पालखी सोहळा (मार्ग - पेटाळा (गडकरी सभागृह) ते महाद्वार चौक ते तटाकडील तालीम, अर्ध शिवाजी पुतळा मार्गे पेटाळा (गडकरी सभागृह) यानंतर श्री परशुरामांचा जन्मकाळ, आरती, भक्तिगीतांचा कार्यक्रम व महाप्रसाद वितरण असा संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी २००० हून अधिक बांधव आणि भगिनी उपस्थित राहून प्रसादाचा लाभ घेतील असा अंदाज आहे.

असे मोठे उत्सव हे आर्थिक साहाय्यामुळेच यशस्वी संपन्न होतात अशी आमची धारणा आहे. आमची आपणांस विनंती कीं, आपल्यासारख्या दातृत्व असणाऱ्या दानशूर व्यक्तींनी आपल्या समाजासाठीच्या या उपक्रमांस सढळ हस्ते यथाशक्ती आर्थिक सहाय्य करून कार्यक्रम आर्थिकदृष्ट्या यशस्वी संपन्न होणेसाठी सहकार्य करावे ही नम्र विनंती.

तसेच या भगवान श्री परशुराम जन्मोत्सव - २०२५ साठी यथाशक्ती आर्थिक सहाय्य करणाऱ्या सर्वांना विनंती कीं, आपण दिलेल्या देणगीची रितसर पावती दिली जाते, तशी पावती घ्यावी. देणगीचा स्वीकार व पावती प्रदान खालील संस्थांच्या मार्फतच केवळ केले जाते याची नोंद घ्यावी.

(१) ब्राह्मण सभा करवीर (मंगलधाम), कोल्हापूर. (२) चित्पावन संघ, कोल्हापूर (३) कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर.
कोल्हापूर चित्पावन संघाचा क्यूआर कोड सोबत देत आहोत त्यावर पैसे ट्रान्सफर करून सहकार्य करावे ही विनंती.

कोल्हापूर चित्पावन संघ QR कोड

टीप : चित्पावन संघ कोल्हापूरच्या QR Code/ Scanner वरून पेमेंट केल्यास मो.क्र. ७६२०५४६२२५ या कार्यालयाच्या व्हॉटस्‌ॲप नंबरवर तुमचे नाव आणि राहण्याचे ठिकाण अवश्य पाठवा... त्यासोबत त्याचा स्क्रीन शॉट सुद्धा शेअर करावा ही विनंती.

आपले नम्र,
संचालक व सल्लागार, कोल्हापूर चित्पावन संघ.
संपर्क :
मकरंद करंदीकर ९४२१११३००५
प्रसाद भिडे ९८२२२४८५०० केदार जोशी ७५८८८३९५२७
संतोष साने ८४५९०१९०९१
सौ संगीता आपटे ८१४९४८००३४

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :**
info@shogini.com

**Visit us at :**
www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.